अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१८-२०१९
“२२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)”
मागणी क्रमांक वाय -२

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख : २८ मार्च, २०१९

वाचा :-

१. शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल,२०१८
२. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३, दि. २० एप्रिल, २०१८
३. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३, दि. ३० जून, २०१८
४. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३, दि. २३ ऑक्टोबर,२०१८
५. शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५ जानेवारी, २०१९
६. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३, दि. २९ जानेवारी, २०१९
७. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१८/प्र.क्र.११५/पापु-२३, दि. १२ मार्च, २०१९
८. बीड जिल्हा परिषद पत्र क्रमांकः जिपबी/ग्रापापु/लेखा-१/कावि-८६८/२०१९, दि. १९ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

बीड जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन व वेतनेतर खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-२ “२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)” या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष सन २०१८-२०१९ करिता ०१, वेतन साठी रुपये ३७,००,००० व ११, देशांतर्गत प्रवास खर्चासाठी रुपये १३,०००/- याप्रमाणे निधी वितरीत केला आहे. या लेखाशिर्षांतर्गत वेतनासाठी रुपये ५,००,०००/- व प्रवासखर्चासाठी रुपये ३२,०००/- याप्रमाणे एकूण रुपये

५,३२,०००/- इतक्या निधीची मागणी बीड जिल्हा परिषदेने संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे. सदर निधी बीड जिल्हा परिषदेला वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे

शासन निर्णय:-

बीड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन व प्रवासखर्च भागविण्यासाठी सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" या लेखाशिर्षाखाली ०१, वेतन या उद्दीष्टाखाली रुपये ५,००,०००/- तसेच ११, देशांतर्गत प्रवास खर्च या उद्दीष्टाखाली रुपये ३२,०००/- याप्रमाणे एकूण रुपये ५,३२,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख बत्तीस हजार फक्त) इतका निधी या शासन निर्णयान्वये बीड जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेले अनुदान शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहील. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या रकमांपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

३. शासनाद्वारे देण्यात येणारे वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत वेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व Offline पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

४. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" ०१, वेतन व ११ देशांतर्गत प्रवास खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ व २५ जानेवारी, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहेत. या परिपत्रकान्वये नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२७१२५४०४३२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.03.28 12:01:49 +05'30'

चेतन निकम
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विधानसभा / विधान परिषद, सर्व
२. विभागीय आयुक्त,
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
६. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
७. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
९. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, बीड
११.उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, बीड
१२.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१३.वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थ-१९)

१४.कार्यासन क्रमांक पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

१५.ग्राम विकास व जलसंधारण विभाग

१६.निवड नस्ती कार्यासन पापु-२३